

पद्मश्री
कर्मवीर काकासाहेब वाघ




K. K. WAGH EDUCATION SOCIETY

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित

# के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (ID NO. :PU/NS/ACSCS/84/2004)
**भाऊसाहेबनगर (पिंपळस रामाचे)**, ता. निफाड, जि. नाशिक.
फोन : (०२५५०) २४३४७०, २४३३७०, फॅक्स : (०२५५०) २४३३७०
Email : disp-seniorbnagar@kkwagh.edu.in
Website : https://ascb.kkwagh.edu.in

## खालील विद्याशाखांसाठी प्रवेश सुरु

❖ बी.ए. ❖ बी. एस्सी. (रसायनशास्त्र)

❖ एम. ए. (इंग्रजी व इतिहास)

# माहितीपत्रक २०२१-२२

के. के. वाघ शिक्षणसंस्था संचलित

# के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय

## के. के. वाघ शिक्षणसंस्थेविषयी :

थोर समाजसुधारक पद्मश्री कै. कर्मवीर काकासाहेब वाघ समाजाच्या विकासासाठी समर्पित असलेले नेते होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे ह्या हेतूने काळाची पावले ओळखून त्यांनी १९७० मध्ये के. के. वाघ शिक्षणसंस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातल्या नामवंत मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षणसंस्थेच्या स्थापनेतही त्यांना सिंहाचा वाटा होता. के. के. वाघ शिक्षण संस्था ही नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात आदर्श निर्माण करुन संस्थेने कृषी शिक्षणातही भरारी मारली आहे. तसेच २००२ पासुन शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र अशा शाखांमधील नवीन संधी उपलब्ध करुन देण्यासाठी के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

आजमितीस संस्थेच्या ३६ विविध महाविद्यालये व विद्यालयांमध्ये १९०० कर्मचारी कार्यरत आहेत व २१,००० विद्यार्थी संस्थेच्या विविध ज्ञानशाखांमध्ये शिक्षण घेत आहेत. संस्थेचे सर्व विश्‍वस्त समर्पित भावनेने संस्थेच्या विकासासाठी प्रयत्नशिल असून संस्था शिक्षणाच्या क्षेत्रात नवनवे किर्तीमान निर्माण करीत आहे.

## महाविद्यालयाविषयी

के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक विज्ञान भाऊसाहेबनगर (पिंपळस रामाचे) महाविद्यालयाची स्थापना जुलै २००४ मध्ये झाली असून महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नीत आहे. वक्तशीरपणा, शिस्तबध्दता, जागरुक प्रशासन, उच्च निकालाची परंपरा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता धडपडणारे तसेच सदैव प्रगतीपथावर असण्याची दूरदृष्टी व समाजसेवेची आस्था ह्या गुणांमुळे महाविद्यालयाने अल्पावधीत प्रसिध्दी मिळवलेली आहे.

## महाविद्यालयात चालवले जाणारे विविध अभ्यासक्रम

### पदवी अभ्यासक्रम :

| शाखा | विशेष विषय | क्षमता |
|---|---|---|
| बी.ए. | इंग्रजी, अर्थशास्त्र, भुगोल व इतिहास | १२० |
| बी.एस्सी. | रसायनशास्त्र | १२० |

### पदव्युत्तर अभ्यासक्रम :

| | | |
|---|---|---|
| एम.ए. | इंग्रजी, इतिहास | प्रत्येकी ६० |

## अद्ययावत सुसज्ज प्रयोगशाळा

**रसायनशास्त्र प्रयोगशाळा :** रसायनशास्त्र प्रयोगशाळेत पदवी अभ्यासक्रमापर्यंत आवश्‍यक असणारी सर्व रसायने, तसेच प्रयोग साहित्य (Autoclave, Vacuum Pump, Vaporizer etc.) पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. तसेच दरवर्षी ५०,००० – ७०,००० ची आवश्‍यक साहित्यची खरेदी केली जाते.

**वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळा :** वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेत पदवी अभ्यासक्रमापर्यंत आवश्‍यक असणारी सर्व क्लासवर्क मटेरिअल, रसायने तसेच सुक्ष्मदर्शके, स्पेसिमेन्स पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. तसेच आवश्‍यकतेनुसार दरवर्षी यांची खरेदी केली जाते.

**प्राणीशास्त्र प्रयोगशाळा :** प्राणीशास्त्र प्रयोगशाळेत पदवी अभ्यासक्रमापर्यंत आवश्‍यक असणारी सर्व क्लासवर्क मटेरिअल, रसायने तसेच सुक्ष्मदर्शके, स्पेसिमेन्स पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. तसेच आवश्‍यकतेनुसार दरवर्षी यांची खरेदी केली जाते.





**भौतिकशास्त्र प्रयोगशाळा :** भौतिकशास्त्र प्रयोगशाळेत पदवी अभ्यासक्रमापर्यंत आवश्यक असणारी सर्व प्रयोग साहित्य (CRO, Sonometers, Compound Microscope, Travelling Microscope, Coupled Pendulum) यासारखे अद्ययावत साहित्य उपलब्ध आहेत. तसेच दरवर्षी आवश्यकतेनुसार नविन साहित्यांची खरेदी केली जाते.

**भूगोल प्रयोगशाळा :** भूगोल प्रयोगशाळेत पदवी अभ्यासक्रमापर्यंत आवश्यक असणारे सर्व नकाशे, प्रयोग साहित्य मॉडेल्स, आधुनिक डंपी लेव्हल तसेच सर्व आवश्यक सर्वेक्षण साहित्य उपलब्ध आहेत. तसेच दरवर्षी आवश्यकतेनुसार नविन प्रयोग साहित्य खरेदी केले जाते.

**ग्रंथालय** ८६२ स्क्वेअर फुटाच्या समृध्द ग्रंथालयात अभ्यासक्रमाची १०५० संदर्भ पुस्तकांसह एकुण ४२११ पुस्तके आहेत. तसेच २५ नियतकालिके व वर्तमानपत्रे उपलब्ध आहेत. महाविद्यालयात स्वतंत्र ई-लायब्ररीची सुविधा उपलब्ध आहे. दरवर्षी ग्रंथालयात सुमारे दोन ते तीन लाख रुपयांच्या संदर्भ पुस्तकांची भर टाकली जाते.

## सुसज्ज जिमखाना

सुसज्ज ७६० स्क्वे. फुटाच्या अद्ययावत व्यायामशाळेसह इतर सुविधाही संस्थेने महाविद्यालयास उपलब्ध करुन दिल्या आहेत. फुटबॉल व हॉकी मैदान उपलब्ध आहे. व्हॉलीबॉल, टेनिस, बास्केट बॉल, कॅरम, बुध्दीबळ अशा अनेक खेळांच्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे. महाविद्यालयातर्फे दरवर्षी कर्मवीर क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.





**लँग्वेज लॅब** विद्यार्थ्यांची इंग्रजी बोलण्याची व ऐकण्याची कला सुधारण्यासाठी महाविद्यालयात अद्ययावत भाषा प्रयोगशाळेची सोय असुन त्यामध्ये विद्यार्थी स्वत:चे बोलणे रेकॉर्ड करुन व ऐकुन इंग्रजी भाषेवर स्वत:च प्रभुत्व वाढवु शकतात.

**ट्रेनिंग व प्लेसमेंट** नामांकित कंपनीत मुलाखत निवड प्रक्रिया व मार्गदर्शन यांवर संस्थेच्या टी अँण्ड पी अंतर्गत मार्गदर्शन करण्यात येते. केंद्राच्या डिजिटल साक्षरता अभियान अंतर्गत विविध शाखेतील विद्यार्थ्यांना ३० दिवस ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात येतो व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.





## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१. संशोधन व विकास विभाग
२. ट्रेनिंग व प्लेसमेंट कक्ष
३. औद्योगिक संस्थांशी परस्परांतर्गत कक्ष
४. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कॉमन रुम.
५. व्यावसायिक समुपदेशकांमार्फत समुपदेशन
६. अद्ययावत जिमखाना विभाग

## महाविद्यालयाचे विविध उपक्रम

१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
२. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास योजना.
३. विद्यार्थिनीं मंच.
४. विद्यार्थी कल्याण मंडळ
५. विशेष मार्गदर्शन योजना.
६. विद्यार्थी सुरक्षा विमा योजना.
७. राष्ट्रीय सेवा योजना.
८. कर्मवीर स्मृती चषक क्रिडा स्पर्धा
९. सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम
१०. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन योजना
११. वार्षिक स्नेहसंमेलन
१२. महिला सबलिकरण
१३. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

Akshar sadhana ▶ (0253) 2511818